# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २४/०७/२०२६ (शुक्रवार )**

---

## रस्ता सुरक्षेसाठी नागपूर ग्रामीण पोलीसांचा अभिनव उपक्रम डायनॅमिक एन्फोर्समेंट ॲक्शन प्लॅन (Dynamic Enforcement Action Plan ) ची अंमलबजावणी सुरू

**नागपूर ग्रामीण पोलिसांनी सातत्यपूर्ण व परिणामकारक रस्ते सुरक्षा उपाययोजनांद्वारे रस्ते अपघात व मृत्यूंमध्ये लक्षणीय घट साध्य केली आहे. दिनांक १ जानेवारी २०२६ ते २२ जुलै २०२६ या कालावधीत सन २०२५ च्या याच कालावधीच्या तुलनेत रस्ते अपघातांतील मृत्यूंमध्ये २३ टक्क्यांनी घट नोंदविण्यात आली आहे. तसेच १ जुलै ते २२ जुलै २०२६ या कालावधीत सन २०२५ च्या तुलनेत ४२ टक्क्यांची लक्षणीय घट नोंदविण्यात आली आहे.**

तरीसुध्दा अपघातांचे स्वरूप, ठिकाणे आणि वेळ यामध्ये सातत्याने बदल होत असल्याचे विश्लेषणातून समोर आले. अपघाताच्या स्वरूपानुसार काही मार्गांवर वाहतूक अंमलबजावणी अधिक गतिमान, माहिती—आधारित आणि परिणामकारक करण्याची आवश्यकता असल्याचे लक्षात घेवुन नागपुर ग्रामीण जिल्हयात मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली जुलै २०२६ पासून Dynamic Enforcement Action Plan हा अभिनव उपक्रम SaveLIFE Foundation यांच्या तांत्रिक सहकार्याने प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आला आहे.

सदर उपक्रम हा पुराव्यावर आधारित, डेटा विश्लेषणाधारित असुन परिणामकेंद्रित अंमलबजावणीद्वारे रस्ते अपघातांमधील मृत्यूंची संख्या आणखी कमी करणे हे या उपक्रमाचे

ध्येय आहे. आतापर्यंत वाहतूक नियमभंगाविरुद्ध कारवाई प्रामुख्याने अपघातप्रवण ठिकाणी स्थिर (Static) तपासणी करून करण्यात येत होती. आता त्यास पूरक म्हणून उच्च मृत्युदर असलेल्या रस्ते मार्गांवर गतिमान (Moving Enforcement) अंमलबजावणी केली जाणार आहे. या अंतर्गत पोलीस अंमलबजावणी वाहनांसह एका ठिकाणी स्थिर न राहता निश्चित करण्यात आलेल्या अपघातांमध्ये अधिक मृत्यू नोंदविण्यात आलेल्या मार्गांवर (High-Fatality Corridors) वर सतत गस्त घालतील. रस्ते अपघातांची आकडेवारी, अपघाताची वेळ, ठिकाण, वाहतूक नियमभंगाचे प्रकार आणि जोखीम विश्लेषण यांच्या आधारे अंमलबजावणीचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे अपघाताची शक्यता अधिक असलेल्या मार्गांवर वेळेत पोहचुन वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर तात्काळ व प्रभावी कारवाई करणे शक्य होणार आहे. या आराखड्यामुळे अतिवेग, धोकादायक वाहनचालक, चुकीच्या दिशेने वाहन चालविणे, हेल्मेट व सीटबेल्टचा वापर न करणे, मोबाईलवर बोलत वाहन चालविणे तसेच मद्यप्राशन करून वाहन चालविणे अशा जीवितास धोका निर्माण करणाऱ्या नियमभंगांवर अधिक प्रभावी नियंत्रण ठेवले जाणार आहे. प्रायोगिक स्वरूपात सुरू करण्यात आलेल्या Dynamic Enforcement Action Plan या उपक्रमाच्या परिणामांचा नियमित आढावा घेऊन आवश्यकतेनुसार त्यामध्ये सुधारणा करण्यात येणार आहे.

**नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे सर्व वाहन चालकांना आवाहन करण्यात येते की, वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, वेगमर्यादेचे पालन करावे, हेल्मेट व सीटबेल्टचा अनिवार्य वापर करावा .**

## श्री. विठ्ठल रूक्मिणी देवस्थान ट्रस्ट धापेवाडा (विदर्भाचे पंढरपूर),येथे मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांची भेट ; सुरक्षा व्यवस्थेची केली पाहणी

पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत मौजा धापेवाडा (बु) येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा श्री. विठ्ठल रूक्मिणी देवस्थान ट्रस्ट धापेवाडा (विदर्भाचे पंढरपूर) येथे आषाढी एकादशी निमित्य दिनांक २५/०७/२०२६ व दि. ३०/०७/२०२६ रोजी यात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यादरम्यान अंदाजे ९० ते ९५ हजार पेक्षा जास्त भाविक तसेच २५० ते ३०० पेक्षा जास्त दिंड्या आणि पालख्यांचे आगमन होत असते.

सदर ठिकाणी आज दिनांक २४/०७/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्यासह भेट दिली. सदर भेटी दरम्यान मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक यांनी संपुर्ण देवस्थान परीसराची पाहणी केली. देवस्थान मंडळाचे पदाधिकारी, यात्रेचे आयोजक यांच्या सोबत चर्चा करून उपाययोजनांबाबत माहीती घेतली आणि त्यांना सुचना दिल्या. नदी पत्रात कोणीही उतरू नये या बाबत उपाययोजना कराव्यात, नदीच्या पुलावर दोन्ही बाजुला मजबुत बॅरीकेट करावे आणि मधुन रस्ता ठेवावा, तसेच आपत्ती व्यवस्थापन पथकाला हजर ठेवावे व इतर महत्त्वाच्या सुचना दिल्या.

सदर बंदोबस्तासाठी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशनंमधून अधिकारी व अंमलदारांची नियुक्ती करण्यात आली असून, वाहतूक व्यवस्थापन, गर्दी नियंत्रण, पार्किंग, महिला सुरक्षा, आपत्कालीन प्रतिसाद, संशयास्पद व्यक्तींवर लक्ष, बॉम्ब शोधक व श्वान पथक, सर्व्हेलन्स व्हॅन तसेच नियंत्रण कक्षाची व्यवस्था करण्यात आली आहे. बंदोबस्तासाठी आपत्कालीन कृती आराखडा तयार आला आहे. नागपुर ग्रामीण पोलीस दल सोशल मिडीयावर सातत्याने लक्ष ठेवुन मॉनिटरींग करत आहे. मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक आणि अपर पोलीस अधीक्षक यांनी बंदोबस्ताची प्रत्यक्ष पाहणी करून सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला आणि उपस्थित अधिकारी व अंमलदार यांना आवश्यक सूचना व मार्गदर्शन केले.

सदर भेटी दरम्यान मा.श्री. हर्ष ए. पोद्दार ,वरिष्ठ पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्यासह श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री

सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग आणि सावनेर पोलीस स्टेशन च्या प्रभारी अधिकारी, पोलीस निरीक्षक श्रीमती ऋतुजा जाधव हे उपस्थित होते.







## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यांवर ०५ गुन्हे नोंद.

दिनांक २३/०७/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात महाराष्ट्र जुगार कायदया अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या सट्टापट्टी आणि ५२ ताश पत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सट्टापट्टी साहित्य, ५२ ताशपत्ते व रोख रक्कम असा एकुण ४९४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

**पोलीस स्टेशन वेलतुर** येथे आरोपी नामे किशन प्रभुजी बोंद्रे,वय ३७ वर्ष,रा. मेंडेकला ता. कुही हा सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्याचे वर १ गुन्हा नोंद आहे.जिल्हा नागपुरयाचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी क्रं १) मुनीश्वर दयाराम मेश्राम, वय ४५ वर्ष,२) उमेश दशरथ बोरकर, वय ६१ वर्षे ३)राजेंद्र चिंतामण देशमुख,वय ४२ वर्षे,४) सोमा कियन राउत, वय ६१ वर्षे ५)महेंद्र श्रीपत डहाके, वय ३५ वर्षे ६)डालचंद ताराचंद राउत, वय ५२ वर्षे ७)सुर्यभान नत्थुजी पटले, वय ४२ वर्षे, सर्व रा. देवमुढरी ता. मौदा जि. नागपुर हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे प्रज्योत नरेंद्र

शर्मा ,वय २६वर्ष ,रा. वनपवनी ता.रामटेक जि.नागपुर हा सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवणी** येथे आरोपी नामे विक्की अनिल भोस्कर, वय ३३ वर्ष, रा. वार्ड क्र ०२ आमडी, ता पारशिवनी, जि नागपुर हा सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्याचेवर ०१ गुन्हा नोंद आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १३ गुन्हे नोंद

दिनांक २३/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू तसेच वाहन असा एकुण ५,१००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी क्र. १) चंद्रशेखर युवनाथ, रा. कोहळा, ता. काटोल, जि. नागपुर , आरोपी क्र. २) निशांत भैयालाल मोहरिया, रा. वाढोणा काटोल, जि नागपुर आणि ०२ महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड येथे** महीला आरोपी हीचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी क्र १) राजुसिंग नत्थुसिंग भोंड, वय ५२ वर्ष, २) सिंकरसिंग जतनसिंग भोंड, वय ३६ वर्ष,३) सुभाषसिंग जतनसिंग भोंड, वय ३९ वर्ष, सर्व रा. आरंभी ता. नरखेड, ज. नागपुर यांचे वर प्रत्येकी १ गुन्हा एकुण ३ गुन्हे नोंद आहे, **पोलीस स्टेशन केळवद येथे** अनोद सोलंकी,वय ४० वर्ष, रा. भिमनगर, झोपडपट्टी, छत्रापुर शिवार, ता.सावनेर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा येथे** विनायक श्रीराम नेवारे,वय ५२ वर्ष ,रा.घरकुल कॉलनी खापा ता. सावनेर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे** आरोपी मोहन प्रकाश शर्मा, वय ४७ वर्ष, रा. बोरखेडी फाटक, ता. जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे रोशन फकीरा चचाने, रा. कावरापेठ उमरेड याचेवर ०१ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी पंजाब तुलाराम धमगाये, वय ६२ वर्षे, रा. विनोबा भावे वार्ड, रामटेक याचेवर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे आरोपी अंकित प्रभूजी शेंडे, वय २६ वर्ष, रा. वार्ड क्र. ४, वेलतूर यांचे वर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे

आरोपी कवडु रामप्रसाद पवार, वय ६५ वर्ष, रा. गरडापार, ह. मु. वासी कॅनलजवळ, ता. भिवापुर, जि. नागपुर यांचे वर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ९००० मिली देशी दारू, १० लिटर मोहाफुल दारू असा एकुण ५,१००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने